**नि.क्र. २८४ च्या आदेशावरुन प्रतिवादी क्र.३ ते ८ तर्फे सा.क्र.७**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – मुकूंद लक्ष्मण तानवडे.

**वय** – ६५ वर्ष, **व्यवसाय** – शेती,

**रा.** – देवर्डे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

**१.** मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळाले आहे. मी प्रतिवादी क्र.१ ला ओळखत होतो, तो आता हयात नाही. प्रतिवादी क्र.४ ही प्रतिवादी क्र.१ ची मुलगी असून मी तिला ओळखतो. देवर्डे गावात माझी पाच ते सहा एकर शेती असून त्यामध्ये मी ऊस व भाताचे पिक घेतो. मी ऊस पिकासाठी हिरण्यकेशी नदीचे पाणी वापरतो. मी त्यासाठी वडिलांच्या नावे कृष्णा पाटील याच्या जमिनीत मोटर बसवलेली आहे. माझे वडिल १० ते १२ वर्षांपूर्वी मयत झाले आहेत. मी चौथाईने मोटरने घेतलेले पाणी लोकांना देतो. मला त्याची रक्कम पाणी घेणा–या शेतक–याचा कारखान्याला ऊस गेल्यानंतर त्याला मिळणा–या बिलातून कपात होऊन माझ्या के. डी. सी. बँक आजरा शाखेमध्ये मिळते.

२. मला देवर्डे येथील गट क्र.१४७, १५३ व १३२ बाबत माहिती आहे. त्या जमिनीत पुर्वी प्रतिवादी क्र.४ कांचनचे ऊसाचे पिक होते. मी सन २०११–२०१२ मध्ये त्यासाठी चौथाईने पाणी दिले होते. तिचा ऊस तांबाडे कारखान्याला गेला होता. तीने मी ऊसाला पाणी दिल्याबाबत कारखान्याला माझे नाव नोंदले होते. मला तीने कारखान्याला घातलेल्या ऊसाचा चौथा हिस्सा माझ्या बँक खात्यात जमा झाला होता. **सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

३. माझा व प्रतिवादी क्र.४ चा तिला चौथाईने पाणी देण्याबाबत लेखी करार झाला नव्हता. सन २०११–२०१२ दरम्यान प्रतिवादी क्र.२ प्रकाश ऊसाचे पिक घेत नव्हता. पाणी पुरवठा माझ्या वडिलांच्या नावे आहे. ज्याच्या नावे योजना आहे त्यालाच चौथाईने पाणी देता येते. माझ्या वडिलांना चार मुले आहेत. माझ्या वडिलांनंतर मी एकटाच पाणी

वाटपाचे काम करत आहे. मला त्यांनी एकटयाला अधिकार दिल्याबाबत लेखी कागद केलेला नाही.

४. कारखान्याला ज्याच्या नावे ७/१२ आहे त्याचाच ऊस घेतला जातो. मला प्रतिवादी क्र.४ चे गाव आठवत नाही. ती विवाहित असून पतीसोबत राहते. मला देवर्डे गावात तिचे मतदार यादीला नाव असल्याची माहिती नाही. वादी क्र.१ ही मयत प्रतिवादी क्र.१ ची पत्नी आणि वादी क्र.२ ही मुलगी आहे. प्रतिवादी क्र.२ हा वादी क्र.१ आणि मयत प्रतिवादी क्र.१ चा मुलगा आहे. मला वादी क्र.१ ने मयत प्रतिवादी क्र.१ तिला नांदवत नसल्याबाबत केलेल्या प्रकरणां बाबत आठवत नाही. प्रतिवादी क्र.४ कांचन ही प्रतिवादी क्र.३ गंगूबाई मारुती उसणकर ची मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ ही मयत प्रतिवादी क्र.१ ची मुलगी नाही.

५. माझ्याप्रमाणे देवर्डे गावात हिरण्यकेशी नदीवरुन इतर लोक देखील शेतक–यांना ऊसासाठी पाणीपुरवठा करतात. प्रतिवादी क्र.२ ने चालू हंगामात मूगाचे पिक घेतले आहे. मूग पिकाला उन्हाळयामध्ये नदीचे पाणी दिले जाते. गट क्र.१४७, १५३ आणि १३२ मध्ये प्रतिवादी क्र.२ चे मूगाचे पिक आहे. प्रतिवादी क्र.२ जन्मापासून देवर्डे गावात राहतो. प्रतिवादी क्र.२ हा वादी व मयत प्रतिवादी क्र.१ हयात असताना त्यांची जमीन कसून पिके घेत होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे प्रतिवादी क्र.४ ला पाणी दिल्याच्या मोबदल्याच्या पावत्या नाहीत. मी सदर पैसे मिळाल्याची कागदपत्रे माझ्या पुराव्यासोबत दाखल केलेली नाहीत.

६. मी पुर्वीपासून राजकारणात आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी राजकारणात असल्यामुळे पुर्वीपासून प्रतिवादी क्र.४ ला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्या प्रमाणे कधीही प्रतिवादी क्र.४ ला पाणी दिलेले नसून तीने ऊसाचे पिक घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.४ ला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादी क्र.२ तर्फे उलटतपास – श्री. व्ही. आर. पाटील वकील.</u>**

७. वादीने घेतलेला उलट तपास स्विकारला.

**प्रतिवादी क्र.९ व १० तर्फे उलटतपास – श्री. एस. एम. देशपांडे वकील.**

८. उलट तपास नाकारला.

**प्रतिवादी क्र.११ ते १५ तर्फे उलटतपास – श्री. व्ही. बी. कड्डूकर वकील.**

९. वकील गैरहजर. प्रतिवादी क्र.११ न्यायालयात हजर. त्याने उलट तपास घेण्यास नकार दिल्यामुळे उलट तपास नाही असा आदेश करण्यात येतो.

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २१.०४.२०२६. (आर. पी. थोरे)

आजरा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA